23 SEP 2024 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कृषी धोरणामध्ये विद्यापीठाच्या शिफारशींचे प्रतिबिंब

## डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. तानाजी घागरेंच्या संशोधनाची दखल

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २२ : कृषी क्षेत्राच्या विकासासाठी केंद्र शासनाने नुकतीच नव्या कृषी धोरणांना मंजुरी दिली. यामध्ये शिवाजी विद्यापीठातील मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता व अर्थशास्त्र विभागातील प्रा. डॉ. एम. एस. देशमुख व यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. तानाजी नामदेव घागरे यांच्या संशोधन प्रकल्पातील शिफारशींचे प्रतिबिंब दिसून येते. त्यांनी मांडलेल्या 'शेतकरी उत्पन्न वृद्धी व ग्रामीण विकासाची शाश्वत योजना' या प्रतिमानातील १८ उद्दिष्टांमधील काही बाबींचा समावेश या कृषी धोरणांमध्ये आहे.

यासाठी डॉ. देशमुख आणि घागरे यांनी नीती आयोगासह कृषी मंत्रालयाकडे पाठपुरावा केला होता.



डॉ. एम. एस. देशमुख



प्रा. डॉ. तानाजी घागरे



डॉ. देशमुख आणि डॉ. घागरे यांनी 'शेतकरी उत्पन्न वृद्धी व ग्रामीण विकासाची शाश्वत योजना' या शीर्षकाखाली हा संशोधन प्रकल्प प्रकाशित केला होता. प्रतिमानाच्या अंमलबजावणीसाठी संशोधकांनी पंतप्रधान कार्यालय, नीती आयोगासह कृषीशी संबंधित सर्व विभागांकडे पाठपुरावा केला. नीती आयोगाने या प्रतिमानाची दाखल घेत हे प्रतिमान राष्ट्रीय पातळीवर लागू करण्यासंदर्भात संशोधकांशी चर्चा केली.

### प्रमुख शिफारशी

- ई-पीक पाहणीत शेतीच्या गटक्रमांकावरून पीक, जमिनीचा पोत, खते, जमिनीचे क्षेत्र याची आकडेवारी उपलब्ध व्हावी
- शेतीसंबंधित सर्व डाटा डिजिटल स्वरूपात उपलब्ध हवा
- सर्व पिकांसाठी हमी भावाचा कायदा हवा
- हमी भावाची निश्चिती करताना ग्राहक, शेतकरी यांच्या आर्थिक चौकटीचा विचार करा
- असे न होता किमान आधारभूत किंमत निश्चित असावी.

> प्रतिमानात सूचविलेल्या नोंदणी प्रक्रिया व कृषी निर्णय-धोरणे ही केंद्र-राज्य शासनाच्या कृषी धोरणातूनही लागू होत आहेत.
>
> **- डॉ. एम. एस. देशमुख,**
> डॉ. तानाजी घागरे

23 SEP 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकनृत्यात जयसिंगपूर कॉलेज प्रथम

## शिवाजी विद्यापीठ जिल्हास्तरीय युवा महोत्सव; आजरा द्वितीय, तर विवेकानंद कॉलेज तृतीय

■ सकाळ वृत्तसेवा

जयसिंगपूर, ता. २२ : जयसिंगपूर कॉलेजमध्ये झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात लोकनृत्य प्रकारात जयसिंगपूर कॉलेजने प्रथम क्रमांक मिळविला. द्वितीय आजरा महाविद्यालय, तृतीय विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, तर उत्तेजनार्थ क्रमांक सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड व राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूरला मिळाला. महोत्सवात १५ कला प्रकारांचे सादरीकरण करण्यात आले.

**स्पर्धेचा सविस्तर निकाल असा;**

**सुगम गायन :** प्रथम - सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, द्वितीय - न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय - देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, उत्तेजनार्थ - चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज हुपरी आणि भोगावती महाविद्यालय कुरुकली.

**एकल लोकवाद्य वादन :** प्रथम - दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय इचलकरंजी, द्वितीय - न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, उत्तेजनार्थ सर्व अधिविभाग कोल्हापूर आणि के.आय.टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर.

**मराठी वक्तृत्व :** प्रथम - यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय वारणानगर, द्वितीय - जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर, तृतीय - शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, उत्तेजनार्थ - राजाराम महाविद्यालय कोल्हापूर आणि विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर. **हिंदी वक्तृत्व :** प्रथम - न्यू कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - दूध सागर महाविद्यालय बिद्री, तृतीय - विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर,



जयसिंगपूर : येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात लोकनृत्य सादर करताना जयसिंगपूर कॉलेजचा संघ.

उत्तेजनार्थ - डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर आणि श्री विजयसिंह यादव महाविद्यालय, पेठवडगाव.

**इंग्रजी वक्तृत्व :** प्रथम - शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय - के. आय. टी. कोल्हापूर, उत्तेजनार्थ - दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी व जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर.

**लोकनृत्य :** प्रथम - जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर, द्वितीय - आजरा महाविद्यालय आजरा, तृतीय - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, उत्तेजनार्थ - सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड व राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर.

**लोककला :** प्रथम - न्यू कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - डॉ. घाळी कॉलेज गडहिंग्लज, तृतीय - सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, उत्तेजनार्थ - डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर व भोगावती महाविद्यालय कुरुकली.

**एकांकिका :** प्रथम - देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, न्यू कॉलेज कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय इचलकरंजी, उत्तेजनार्थ - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर व आजरा महाविद्यालय आजरा.

**लघु नाटिका :** प्रथम - जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर, द्वितीय - न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय - राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय रूकडी, उत्तेजनार्थ - भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर व सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

**मूकनाट्य :** प्रथम - दूधसागर महाविद्यालय बिद्री, द्वितीय - दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय इचलकरंजी, तृतीय - भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, उत्तेजनार्थ - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर व राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर.

**पथनाट्य :** प्रथम - शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - राजाराम महाविद्यालय कोल्हापूर, तृतीय - दूधसागर महाविद्यालय बिद्री, उत्तेजनार्थ - जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर व राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर.

**भारतीय समूहगीत :** प्रथम - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, तृतीय - सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, उत्तेजनार्थ - न्यू कॉलेज कोल्हापूर व राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर.

**वादविवाद :** प्रथम डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर, द्वितीय - सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, तृतीय- दूधसागर महाविद्यालय बिद्री, उत्तेजनार्थ न्यू कॉलेज कोल्हापूर व श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी.

**प्रश्नमंजूषा :** प्रथम - के.आय. टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, द्वितीय - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, तृतीय - डी. डी. शिंदे सरकार कॉलेज कोल्हापूर, उत्तेजनार्थ - न्यू कॉलेज कोल्हापूर व डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर.

**एकपात्री अभिनय :** निकाल प्रलंबित ठेवण्यात आला आहे.

2 3 SEP 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तरुणाईच्या जल्लोषाला उधाण

## जयसिंगपुरात शिवाजी विद्यापीठाच्या ४४ व्या युवा महोत्सवाची दिमाखात सांगता

## विविध कलाप्रकारांत न्यू कॉलेज, शहाजी लॉ, दूधसागर, कॉमर्स कॉलेज, विवेकानंदची बाजी

जयसिंगपूर : पुढारी वृत्तसेवा

येथील जयसिंगपूर कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठाचा जिल्हास्तरीय ४४ वा युवा महोत्सव तरुणाईच्या सळसळत्या उत्साहात, जोशात पार पडला. यात जिल्ह्यातील ७६ महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. महोत्सवात १५ कला प्रकारांचे सादरीकरण झाले.



**जयसिंगपूर : येथे शिवाजी विद्यापीठाच्या ४४ व्या युवा महोत्सावातील लोकनृत्य स्पर्धेत जयसिंगपूर कॉलेजने प्रथम क्रमांक पटकाविला.**

**निकाल अनुक्रमे (प्रथम तीन क्रमांक आणि उत्तेजनार्थ दोन संघ) असा :**

**सुगम गायन** - शिवाजी विद्यापीठ, न्यू कॉलेज-कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स-कोल्हापूर, उत्तेजनार्थ चंद्राबाई शातांप्पा शेंडूरे कॉलेज-हुपरी, भोगावती महाविद्यालय-कुरुकली.

**एकल लोकवाद्य** - दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय-इचलकरंजी, न्यू कॉलेज-कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज-कोल्हापूर, केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग-कोल्हापूर.

**मराठी वक्तृत्व** - यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय वारणानगर, जयसिंगपूर कॉलेज व शहाजी लॉ कॉलेज-कोल्हापूर, राजाराम महाविद्यालय-कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज-कोल्हापूर.

**हिंदी वक्तृत्व** - न्यू कॉलेज, दूधसागर महाविद्यालय-बिद्री, विवेकानंद-कोल्हापूर, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग-कोल्हापूर, विजयसिंह यादव महाविद्यालय-पेठवडगाव.

**इंग्रजी वक्तृत्व** - शहाजी लॉ कॉलेज-कोल्हापूर, न्यू कॉलेज, केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, दत्ताजीराव कदम महाविद्यालय, जयसिंगपूर कॉलेज.

**लोकनृत्य गुण** - जयसिंगपूर कॉलेज, आजरा महाविद्यालय, विवेकानंद कॉलेज, उत्तेजनार्थ सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज-कोल्हापूर.

**लोककला** - न्यू कॉलेज, डॉ. घाळी कॉलेज गडहिंग्लज, शिवाजी विद्यापीठ, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, भोगावती महाविद्यालय-कुरुकली.

**एकांकिका** - देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, न्यू कॉलेज, दत्ताजीराव कदम महाविद्यालय, उत्तेजनार्थ विवेकानंद कॉलेज, आजरा महाविद्यालय.

**लघुनाटिका** - जयसिंगपूर कॉलेज, न्यू कॉलेज, राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय-रूकडी, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग-कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ.

**मूकनाट्य-दूधसागर** : महाविद्यालय बिद्री, दत्ताजीराव कदम महाविद्यालय, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, उत्तेजनार्थ विवेकानंद कॉलेज, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज-कोल्हापूर.

**पथनाट्य** - शहाजी लॉ कॉलेज, राजाराम महाविद्यालय, दूधसागर महाविद्यालय-बिद्री, जयसिंगपूर कॉलेज, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज-कोल्हापूर.

**समूहगीत** - विवेकानंद कॉलेज, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज, शिवाजी विद्यापीठ, न्यू कॉलेज, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज-कोल्हापूर.

**वादविवाद** - डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ, दूधसागर महाविद्यालय-बिद्री, न्यू कॉलेज, श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी.

**प्रश्नमंजुषा** - केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, विवेकानंद कॉलेज, डी. डी. शिंदे सरकार कॉलेज कोल्हापूर, न्यू कॉलेज, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर.

**एकपात्री अभिनय** - निकाल प्रलंबित.

23 SEP 2024 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिला सुरक्षेची जबाबदारी सर्वांचीच

प्रतिनिधी
कोल्हापूर

- अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे
- शिवाजी विद्यापीठात विभागस्तरीय एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात

महिलांना सुरक्षित सामाजिक पर्यावरण उपलब्ध करून देणे ही सर्वच समाजघटकांची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन कोल्हापूरचे अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे यांनी केले. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती" या विषयावर एकदिवसीय विभागस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहात शुक्रवारी ही कार्यशाळा संपन्न झाली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अशोक उबाळे, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिंदे म्हणाले, समाजातील सर्वच स्त्रियांप्रती आपला दृष्टीकोन हा संवेदनशील असला पाहिजे. याची जाणीव निर्मिता होण्याची अपेक्षा आहे. महिला सुरक्षा धोरणाच्या अंमलबजावणीच्या बाबतीत शासन आणि पोलीस प्रशासन गंभीर आहे. तथापि, बदनामीला घाबरून सुमारे ८० टक्के तक्रारी दाखल होत नाहीत. समाज एकजुटीने महिलांच्या पाठीशी उभा राहिला, तर हे चित्र बदलणे सहजशक्य आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यार्थिनींच्या पालकांचा शिक्षणसंस्थांवर विश्वास असतो. त्यामुळे आपल्याकडे शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थिनीच्या बाबतीत आपण सर्वच जण पालक आहोत, ही भावना घेऊन त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे आपले कर्तव्य आहे. मुलींकडून प्राप्त होणाऱ्या गंभीर स्वरुपाच्या निनावी तक्रारींचीही संवेदनशीलतेने तपासणी करून तथ्य आढळल्यास वेळीच योग्य ती कार्यवाही करावी, अशा सुचना त्यांनी सर्वच शिक्षणसंस्थांना केल्या.

कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले. दिवसभरात विविध सत्रांमध्ये महिला सुरक्षेच्या अनुषंगाने सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वाती यादव, संकटसमयी मदत घेण्याच्या अनुषंगाने निर्भया पथक प्रमुख पोलीस निरीक्षक क्रांती पाटील, महिला सुरक्षाविषयक कायद्यांच्या अनुषंगाने ॲड. आसावरी कुलकर्णी, विशाखा मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुषंगाने डॉ. भारती पाटील आणि राजर्षी शाहू शिष्यवृत्तीच्या अनुषंगाने डॉ. अशोक उबाळे यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 SEP 2024 तरुण भारत


# डिजिटल माध्यमामध्ये स्वत:चा आशय निर्माण करा

## आदित्य पिंपळे : शिवाजी विद्यापीठात डिजिटल उत्पन्नाच्या स्त्रोतवर कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

ओरिजनल, उपयुक्त, प्रभावी, परिणामकारक व रोचक आशय दिल्यास ग्राहक जास्त वेळ डिजिटल माध्यमांत गुंततो. आशय ओरिजनल असला तरच डिजिटल माध्यमांचे उत्पन्न वाढू शकते. रेडिमेड आशय घेऊन कॉपीराईटचे मुद्दे उद्भवू शकतात. ते टाळण्यासाठी कॉपी न करता स्वत:चा आशय निर्माण करता आला पाहिजे, असे प्रतिपादन दिल्लीतील वृत्तवाहिनीचे क्रीडा विश्लेषक आदित्य पिंपळे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने आयोजित 'डिजिटल माध्यमांच्या



उत्पन्नाचे स्त्रोत' विषयावर एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी सोलापूर येथील संपादक गणेश गायकवाड, अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, जयप्रकाश पाटील, डॉ. सुमेधा साळुंखे, अनुप जत्राटकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

पिंपळे म्हणाले, डिजिटल माध्यमांसाठी तगड्या आशयासह मार्केटिंगचीही जोडही द्यावी लागते. उत्पादनाचे आक्रमक मार्केटिंग करायला हवे. पारंपरिक पद्धतीचा आशय न देता वेगळ्या विचाराने ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन आशयनिर्मिती व्हावी. डिजिटल प्लॅटफॉर्म सातत्याने धोरणांत बदल करत असतात. बदललेली धोरणे विचारात घेऊन आशय निर्मिती व्हावी, असा सल्ला त्यांनी दिला.

गायकवाड म्हणाले, डिजिटल माध्यमांतून उत्पन्न मिळविण्यासाठी आवड, सातत्य, संयम आणि प्रचंड मेहनत घेण्याची तयारी असली पाहिजे. ग्राहकांच्या आवडीनिवडी समजून घेणे आवश्यक आहे. डिजिटल माध्यमांनी विश्वासार्हता कमावणे काळाची गरज आहे. विश्वासार्ह माध्यमानांच जास्त उत्पन्न मिळू शकते. 'जसं आहे तसं' लोकांपर्यंत पोहोचवता आले तर डिजिटल माध्यमांची विश्वासार्हता वाढेल. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रेरणा पाटील यांनी सूत्रसंचालन केले. ऋषिकेश गोळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
23 SEP 2024
तरुण भारत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी विद्यापीठच घेणार परीक्षा

## काही महाविद्यालयातील गैरप्रकारामुळे प्रशासनाचा निर्णय : प्राचार्य संघटनेचा विरोध डावलून परीक्षा घेणार

**अहिल्या परकाळे**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठांतर्गत २९६ महाविद्यालयांत पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षा २०१२ पासून महाविद्यालय पातळीवर घेण्याचे आदेश विद्यापीठ प्रशासनाने दिले होते. तेंव्हापासून महाविद्यालय पातळीवर प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते निकालापर्यंत सर्व कामकाज होत होते. परंतु काही महाविद्यालयांनी परीक्षेपुर्वीच मॉडेल पेपरच्या नावाखाली प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना दिल्या. दर्जाहीन प्रश्नपत्रिका तयार केल्या. तसेच एखादा विद्यार्थी अनुत्तीर्ण होत असला तरी ओढून-ताणून त्याला उत्तीर्ण केले जात असल्याचे प्रकार विद्यापीठाच्या समितीच्या निदर्शनास आले. परिणामी गुणवत्ता वाढीसाठी विद्यापीठच परीक्षा घेईल, असा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने अधिकार मंडळाच्या मान्यतेने



घेतला आहे.

परीक्षा घेण्यासाठी महाविद्यालयाला दिलेल्या अधिकाराचा गैरवापर काही महाविद्यालयांनी केला आहे. त्यामुळे प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका बनवणे, परीक्षेला लागणाऱ्या मनुष्यबळाचा खर्च विद्यापीठ करणार आहे. वेळेत निकाल जाहीर करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात २ते ३ पेपर मूल्यमापन केंद्रे केली जाणार आहेत. प्रत्येक मूल्यमापन केंद्राला विषयनिहाय १० ते १२ हजार उत्तरपत्रिका तपासणीसाठी दिल्या जातील. परिणामी परीक्षेची गुणवत्ता राहील. प्रॅक्टीकल परीक्षाही विद्यापीठ घेईल, त्यासाठीच्या परीक्षकाची नियुक्ती विद्यापीठच करणार आहे.

२०२३-२४ शैक्षणिक वर्षातील पदवी व्दितीय वर्षातील दोन सत्राच्या परीक्षाही महाविद्यालय पातळीवर घेतल्या. परंतु आता प्रथम, व्दितीय आणि तृतीय वर्षासह सर्वच अभ्यासक्रमाच्या परीक्षा विद्यापीठच घेणार आहे. विद्यापीठ पातळीवर प्रश्नपत्रिका दर्जेदार काढून त्या एसआरपीडीव्दारे महाविद्यालयांना पाठवण्यात येणार आहेत. पाच मिनिट अगोदर आलेल्या प्रश्नपत्रिकांची प्रिंट किंवा झेरॉक्स काढून विद्यार्थ्यांना वाटप करायचे आहे. परीक्षेदरम्यान गैरप्रकार आढळल्यास परीक्षा प्रमाद समितीच्या नियमानुसार कारवाईही करणार आहे.

काही महाविद्यालयांत आपला निकाल शंभर टक्के लागावा यासह अन्य कारणांसाठी परीक्षेतच गैरप्रकार होऊ लागले आहेत. परीक्षेदरम्यान पेपरफुटीसह विद्यार्थ्यांना कॉपी पुरवण्यापर्यंत अनेकांची मजल गेली आहे.

हा प्रकार मोडीत काढून गुणवत्तापूर्ण प्रश्नपत्रिकेच्या आधारावर परीक्षा घेण्याचा निर्णय विद्यापीठातील परीक्षा विभागाने घेतला आहे. याला प्राचार्य संघटनेने विरोध केला होता, परंतु त्याला डावलून विद्यापीठ ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्येच या परीक्षेची अंमलबजावणी होण्याची शक्यता आहे.

### काही महाविद्यालयात या गोष्टी निदर्शनास आल्या

महाविद्यालय स्तरावरावरील परीक्षा व पेपरच्या मूल्यमापनावेळी विद्यापीठातील समितीने भेटी दिल्या. तेंव्हा काही महाविद्यालयांत त्याच गोष्टी चुकीच्या घडत असल्याचे निदर्शनास आले. विद्यापीठ व महाविद्यालयातील प्रश्नपत्रिकेच्या गुणवत्तेत तफावत होती, काही महाविद्यालयांनी परीक्षेपुर्वीच प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना दिल्या. कॉपीचे किंवा पेपरफुटीचे प्रकारही समोर आले. महाविद्यालयात नियमित शिक्षक नियुक्तीचा अभाव असल्याचेही निदर्शनास आले.

### वेळेत निकाल जाहीर व्हावेत

काही महाविद्यालयांत गैरप्रकार घडल्यामुळे परीक्षा काढून घेण्याचा प्रस्ताव विद्यापीठाने मांडला. गुणवत्तापूर्ण परीक्षेसाठी विद्यापीठ परीक्षा घेईल, असा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. हा निर्णय स्वागतार्ह आहे. परंतु परीक्षा व निकाल वेळेत जाहीर झाले पाहिजेत. कॅप सेंटर रोटेशननुसार ठेवावेत. वेळेत निकाल लागावेत.

**डॉ. मंजिरी मोरे** (चेअरमन, शिक्षण प्रसारक मंडळ, सदस्य, विद्या परिषद, शिवाजी विद्यापीठ)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 SEP 2024
पुण्यनगरी




# 'कोरे अभियांत्रिकी 'च्या मुलींचा संघ विजेता

**वारणानगर / कोडोली :** येथील तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी अभियांत्रिकी महाविद्यालयाने आष्टा, जि. सांगली येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला बास्केटबॉल स्पर्धेच्या अंतिम सामन्यात वालचंद कॉलेज ऑफ इंजि. महाविद्यालयाचा पराभव करत विजेतपद पटकावले. पूर्वा भोसले हिला बेस्ट खेळाडू म्हणून गौरवण्यात आले. विजेत्या संघामध्ये पूर्वा भोसले, मनस्वी मोरे, निर्झरा पाटील-जाधव, श्रावणी भोसले, अनन्या संदे, वृषाली निकम, वैष्णवी अडनाईक, श्रेया जाधव, प्रेरणा पाटील, कृष्णाली पाटील, आर्या पाटील, सम्राज्ञी पाटील या खेळाडूंचा समावेश होता.